# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडल, औरंगाबाद.

## प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/शहर/६१६/२०१७/०९

**(नोदंणी क्रमांक  २०१७०२००३६)**

| | | |
|---|---|---|
| तक्रार दाखल | दिनांक :- | १४.०२.२०१७ |
| निकाल | दिनांक :- | ०५.०४.२०१७ |

श्री. महेंद्रसिंग वरियामसिंग सलुजा, — तक्रारदार
५१, सिंधी कॉलनी, जालना रोड,
औरंगाबाद.
(ग्राहक क्रमांक  ४९००१०३६५१५२)

## विरुध्द

१) कार्यकारी अभियंता (प्रशासन), — गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
शहर मंडल, औरंगाबाद.

२) श्री. ताराचंद भाटी, — गैरअर्जदार
जगधने किचन वेअर्स,
भाजीमंडी रोड, सुंदर नगर,
औरंगाबाद.

## मंच

| | |
|---|---|
| १ ) डॉ.भास्कर पालवे | अध्यक्ष |
| २ ) श्री. उत्तम.म.उरकुडे | सदस्य / सचिव |
| ३ ) श्री. वि. सु.  काबरा | सदस्य |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार श्री. महेंद्रसिंग वरियामसिंग सलुजा, ५१, सिंधी कॉलनी, जालना रोड, औरंगाबाद (ग्राहक क्रमांक ४९००१०३६५१५२) यांनी कार्यकारी अभियंता, नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ यातील परिशिष्ट -अ नमुन्यात दिनांक १४.०२.२०१७ रोजी तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.

अर्जदार हे धन्नासिंग बिल्डिंग, औरंगपूरा, औरंगाबाद या इमारतीचे मालक असून त्यामधील दुकान क्रमांक ५ मध्ये श्री. ताराचंद भाटी हे भाडयाने रहात आहेत. सदरील दुकानाचे विद्युत मिटर मागील २० वर्षांपुर्वी कायम स्वरुपी बंद (P. D.) करण्यात आलेले आहे व सदरील मीटर जप्त करण्यात आले होते.

सदरील ठिकाणी दुकान मालकाचे कोणतेही N.O.C. नसतांना भाडेकरुला कोणत्या नियमानुसार नवीन मीटर देण्यात आले. दुकान मालकाने भाडेकरु श्री. ताराचंद रुपचंद भाटी यांच्या विरुध्द मा. उच्च न्यायालयात दावा दाखल केला आहे.

अर्जदाराने सदरील भाडेकरुस देण्यात आलेले नवीन मीटर महावितरणने काढुन घेण्याचे आदेश देण्यात यावेत अशी विनंती ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचास केली आहे.

**<u>कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे म्हणणे.</u>**

महावितरण, औरंगाबाद यांचे दिनांक २७.०२.२०१७ च्या पत्रानुसार आपले म्हणणे सादर केलेले आहे.

१) श्री. महेंद्रसिंग वरियामसिंग सलुजा यांच्या तक्रार अर्जानुसार वीज ग्राहक श्री. ताराचंद भाटी यांच्या विद्युत मीटरचा पुरवठा दिनांक ३१.१२.२००० पासून कायम स्वरुपी बंद करण्यात आला होता. श्री. ताराचंद भाटी यांचा ग्राहक क्रमांक ४९००१०३६५१५२ असा आहे. त्यावेळी त्याचेकडे रुपये १६,७९४/- एवढी वीज बिलाची रक्कम बाकी होती.

२) महावितरणने माहे ऑक्टोर २०१६ मध्ये परिपत्रक क्रमांक २६९/२७० कायमचा विद्युत पूरवठा खंडीत केलेल्या ग्राहकांसाठी नवप्रकाश योजना सुरु केली. त्या अंतर्गत सदर ग्राहकाने थकीत वीज बिलाचा भरणा केला . त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

ग्राहक क्रमांक ४९००१०३६५१५२ ग्राहकाने रुपये १०,५६०/- एवढी रक्कम पावती क्रमांक ५५१९०७२ दिनांक २४.०१.२०१७ रोजी भरली.

३) सदरील ग्राहकास नवीन वीज जोडणी देण्यात आलेली नाही. पूर्वीचा कायमचा वीज पूरवठा खंडित केलेली वीज जोडणी नवप्रकाश योजने अंतर्गत जोडलेली आहे. त्यामुळे तक्रारदार यांच्या जागेच्या मालकीबाबत असलेल्या वादाशी महावितरणचा काहीही संबंध येत नाही. तसेच महावितरणचे वीज बील हे जागेच्या मालकी हक्काचे असत नाही, तरी अर्जदाराचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात यावा अशी विनंती ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचास करण्यात आलेली आहे.

**ग्राहक श्री. ताराचंद भाटी यांचे म्हणणे :**

१) महावितरण कंपनीचे परिपत्रक क्रमांक २६९/२७० नुसार कायमस्वरुपी वीज खंडीत ग्राहकास नवप्रकाश योजना अंतर्गतचा फायदा घेणेसाठी माझेकडे असलेली थकबाकी रक्कम रुपये १०५६०/- भरणा नियमानुसार करुन वीज पूरवठा सुरु केलेला आहे.

२) तक्रारदार हे स्वतः ग्राहक नसुन मी त्यांचेकडे भाडयाने राहात आहे व वीज कनेक्शन माझे नावे आहे. जागा खाली करणे बाबत घरमालक सेशन कोर्ट मध्ये हारल्यानंतर त्यावर त्यांनी मा. हायकोर्टामध्ये अपिल दाखल केले आहे. मा. उच्च न्यायालयाने वीजेसाठी अथवा इतर कारणासाठी कोणतीही बंदी आणलेली नाही व सदरचे प्रकरण मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ट आहे, करीता माझा वीज पूरवठा खंडीत करु नये.

**ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निष्कर्ष**

अर्जदार आणि गैरअर्जदार यांनी सुनावणी दरम्यान केलेल्या सादरीकरणा नुसार खालील प्रमाणे निष्कर्ष निघतात.

१) श्री. ताराचंद रुपचंद भाटी हे दुकान क्रमांक ५ धन्नासिंग बिल्डींग, औरंगपूरा येथे श्री. महेंद्रसिंग सलुजा यांचे मकानामध्ये भाडेकरु आहेत व ते स्वतः महावितरण कंपनीचे अधिकृत ग्राहक असून अर्जदार यांचे नावे सदरची वीज जोडणी नाही.

२) महावितरणने श्री. ताराचंद रुपचंद भाटी ग्राहक क्रमांक ४९००१०३६५१५२ चे कायम स्वरुपी बंद (P. D.) झालेले विद्युत जोडणी परिपत्रक्र क्रमांक २६९/२७० अन्वये कायमचा वीज पूरवठा खंडीत केलेल्या ग्राहकांसाठी नवप्रकाश योजने अंतर्गत थकबाकी रक्कम रुपये १०,५६०/- चा भरणा करुन पुन्हा सुरु केलला आहे. या ठिकाणी कोणतीही नवीन विद्युत जोडणी करण्यात आलेली नाही.

३) विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४३ मध्ये कोणत्याही जागेच्या मालकाने अथवा वहिवाटदाराने वीज जोडणीसाठी अर्ज केल्यास वीज वितरण लायसन्सदाराकडुन वीज पूरवठा करण्याबाबतची तरतूद आहे. त्याच प्रमाणे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता व पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ अन्वये विनियम ४ मध्ये अर्जदाराने वीज जोडणी करीता मागणी करतांना सादर करावयाचा तपशिल नमुद करण्यात आलेला आहे.

४) अर्जदाराने त्याच्या अधिकृत ओळखपत्रासह (फोटोसहित) व त्याच्या वास्तवा सबंधीचा पुरावा जोडून वीज जोडणीसाठी आवश्यक ते शुल्क भरुन विनियमानुसार रितसर परिपूर्ण अर्ज केल्यास व कोणतेही कायदेशीर निर्बंध नसल्यास, अशा जागेस वीज जोडणी देण्यात यावी. त्यासाठी ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. या संबंधी महाराष्ट्र शासनाने परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०१६/प्र.क्र. २६५/ऊर्जा-५ अन्वये दिनांक १८ ऑक्टोबर २०१६ रोजी शासकीय परिपत्रक काढलेले आहे. त्यात असे सुध्दा नमुद केले आहे की, अशा जागेस वीज वितरण कपंनीकडुन विहीत कार्यपध्दतीनुसार वीज जोडणी दिल्यास केवळ ही बाब ती जागा अधिकृत असल्याबाबतचा पुरावा आहे असे ग्राहय धरता येणार नाही किंवा अशा ठिकाणच्या वीज देयकाचा वापर सदरची जागा अधिकृत ठरविण्यासाठी पुरावा म्हणुन ग्राहय धरता येणार नाही.

५/-

५) अर्जदार व गैरअर्जदार क्र. २ यांचा जागेबाबतचा वाद सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) औरंगाबाद त्यांचे न्यायालयात निकाली निघाला असून त्यानुसार गैरअर्जदार क्र. २ हे अर्जदारास दरमहा घरभाडे भरणा करीत असल्याचे पुरावे सादर केलेले आहेत व सदरचे प्रकरण मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद यांचेकडे न्यायप्रविष्ट असून त्यावर कोणताही मनाई हुकुम वा इतर बंदी आदेश पारीत झालेला नाही. त्यामुळे त्यात हस्तक्षेप करणे योग्य नाही.

६) वीज ही अत्यावश्यक गरज असून नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने गैरअर्जदार क्रमांक २ यांना वीज पुरवठयापासून वंचित करणे योग्य नाही.

७) अर्जदारांनी शुध्द हेतूने या मंचास तक्रार दाखल केलेली नसून गैरअर्जदार क्र. २ यांना नाहक त्रास देण्याचे दृष्टीने या मंचाचा वेळ वाया घातला आहे. त्यामुळे त्यास दंडीत करणे गरजेचे आहे.

८) अर्जदारास वीज पूरवठा करु नये या संबंधी कोणत्याही न्यायालयात दावा न्यायप्रविष्ट नाही.

**वरील प्रमाणे अर्जदार, गैरअर्जदार यांनी मांडलेले म्हणणे तसेच ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच (सदस्य श्री. वि. सु. काबरा हे वरील मतास असहमत) यांचे निष्कर्ष यावरुन मंच खालील प्रमाणे बहुमताने आदेश पारीत करीत आहे.**

# आदेश

**१) अर्जदाराचा अर्ज अमान्य करण्यात येत आहे.**

**२) अर्जदार यांचेकडुन रुपये ५०००/- दंडात्मक रक्कम अर्जदाराचे विद्युत कनेक्शन क्रमांक ४९००११८२०९११ द्वारे वसुल करावी.**

| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | असहमत |
|---|---|---|
| डॉ.भास्कर गो.पालवे | उत्तम.म.उरकुडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |

# श्री. वि. सु. काबरा, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, औरंगाबाद परिमंडल यांचे मत
## (Differ Judgement)

१) श्री. ताराचंद रुपचंद भाटी हे दुकान क्रमांक ५ धन्नासिंग बिल्डींग, औरंगपूरा येथे श्री. महेंद्रसिंग सलुजा यांचे मकानामध्ये भाडेकरु आहेत व ते स्वतः महावितरण कंपनीचे अधिकृत ग्राहक असून अर्जदार श्री. महेंद्रसिंग वरियामसिंग सलुजा, जागा मालक हे सुध्दा विद्युत ग्राहक आहेत.

२) महावितरणने श्री. ताराचंद रुपचंद भाटी ग्राहक क्रमांक ४९००१०३६५१५२ चे वीज जोडणी डिसेंबर २००० मध्ये बीलाचे देयक अदा न केल्यामुळे कायम स्वरुपी बंद (P. D.) केलेले होते. त्यानंतर गेली १७ वर्षे त्यांना आपल्या भाडे तत्वावर घेतलेल्या दुकानासाठी विजेची आवश्यकता का भासली नाही, हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो. आपल्या दुकाना संदर्भात भाडेकरुने मंचासमोर कोणतेही परवाने जसे शॉप ॲक्ट, विक्रीकर इत्यादी सादर केलेले नाहीत.

३) महावितरणची ''अभय योजना'' ही परिपत्रक्र क्रमांक २६९/२७० अन्वये घोषित करण्यात आली. त्यानंतर अर्जदाराने भाडेकरु कडुन बंद केलेला वीज पूरवठया संदर्भात हालचाली पाहून गैरअर्जदार वीज वितरण कंपनीला आगाऊ मध्ये जागे संदर्भातील जागा मालक व भाडेकरु यांच्यातील वाद हा सन्माननीय न्यायालया समोर चालत असून त्या संदर्भात माहीती दिलेली दिसून येते.

४) त्यानंतर भाडेकरु ग्राहकाने अभय योजनेखाली अर्ज करुन डिसेंबर २००० साली कायम स्वरुपी बंद असलेला वीज जोडणी थकबाकी रक्कम भरुन पुन्हा सुरु करुन घेतली. पण वीज जोडणी घेतांना / देतांना भाडेकरु ग्राहक किंवा गैरअर्जदार महावितरण कंपनीने जागा मालकाची कोणतीही ''एनओसी'' जी जरुरी असतांना सुध्दा घेतली नाही. त्यामुळे मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे भाडेकरु व जागामालक यांच्यातील वाद न्यायप्रविष्ट असतांना सुध्दा व हे अर्जदाराने निदर्शनास आणुन दिल्यावर सुध्दा कोणतीही ''एनओसी'' किंवा कोर्टाचे आदेश नसतांना सुध्दा नविन जोडणी देऊन हस्तक्षेप केल्याचे दिसून येते.

५) **कोणतही प्रकरण न्यायप्रविष्ट असतांना त्यामध्ये हस्तक्षेप करणे ही बाब न्यायालयाचा अवमानही ठरु शकते व या ठिकाणी महावितरण कंपनीचे** ''अभय योजना २०१६-१७'' ही परिपत्रक्र क्रमांक २६९ अन्वये परिच्छेद क्रमांक ८ (सी) नुसार स्पष्टपणे सांगितलेले आहे की, एखाद्या न्यायालयात किंवा मंचासमोर बाकी संदर्भात कोणताही दावा चालू असल्यास त्या ग्राहकाला त्या दाव्यातून मुक्त झाल्यानंतरच सदरील योजनेचा फायदा/भाग घेता येईल व या प्रकरणात तक्रारदाराने जिल्हा न्यायाधीश -३, औरंगाबाद यांचे न्यायालयात रेन्ट अपील किंवा भाडे अपील नंबर १२/२००७ या प्रकरणात अंशतः मंजूर झालेल्या निर्णया विरोधात मा. उच्च न्यायालय खडपीठ, औरंगाबाद यांचेकडे अर्जंट अपील नंबर १४१२८/२०१४ प्रमाणे सदरील जागेच्या भाडे वसुली व कब्जा मिळण्यासाठी आव्हान केले आहे. **8-c- clearly states that –if there is any ongoing dispute pending in respect of dues in any forum/court then consumer participating in scheme will have to withdraw such dispute before participating in this scheme.**

६) विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४३ मध्ये कोणत्याही जागेच्या मालकाने अथवा वहिवाटदाराने वीज जोडणीसाठी अर्ज केल्यास वीज वितरण लायसन्सदाराकडुन वीज पूरवठा करण्याबाबतची तरतूद आहे. त्याच प्रमाणे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा
संहिता व पुरवठयाच्या इतर अटी) विनियम २००५ अन्वये विनियम ४ मध्ये अर्जदाराने वीज जोडणी करीता मागणी करतांना सादर करावयाचा तपशिल नमुद करण्यात आलेला आहे.

७) अर्जदार व गैरअर्जदार क्र. २ यांचा जागेबाबतचा वाद सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) औरंगाबाद त्यांचे न्यायालायात निकाली निघाला असून त्यानुसार भाडेकरु श्री. ताराचंद भाटी यांचेकडुन रुपये १८०००/- भाडे थकबाकी व रुपये ४१६२.५० इतके दरसाल १५ टक्के व्याजासह या दराने वसुलीस पात्र असल्याचे आदेश अपील क्र. १२/२००७ मध्ये श्री. एस एल अणेकर, जिल्हा न्यायाधीश, औरंगाबाद यांनी दिलेले आहेत.

८) भाडेकरु श्री. ताराचंद भाटी यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या आदेशानुसार रुपये १८०००/- बाकी असून व त्यावरील व्याज देणे लागत असल्यामुळे, भाडे वसुलीसाठी व जागेच्या कब्जा मिळणेसाठी जागामालकास मा. उच्च न्यायालयाकडे दावा न्यायप्रविष्ट असल्यामुळे भाडेकरु हा कायदेशीर कब्जेदार होऊ शकत नाही व अशा परिस्थितीत न्यायालयाचे आदेश नसतांना सुध्दा महावितरण कंपनी व भाडेकरु यांनी नविन वीज जोडणी करुन घेतली.

९) नविन विजेचे मीटर देतांना ग्राहकाकडुन ए-१ फार्म सोबत जागा मालकाचे एनओसी व तीन महिन्यांची भाडे पावती भाडेकरुने दिल्यावरच किंवा रुपये २००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञा पत्र द्यावे लागते असे महावितरण परिपत्रक क्रमांक एसई/अेयुसी/टेक/००४३१६ दिनांक १७ ऑक्टोबर २०१७ या प्रमाणे स्पष्ट आदेश दिलेले असतांना सुध्दा या आदेशाचे पालन झालेले दिसून येत नाही.

१०) वीज ही अत्यावश्यक गरज असून नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने गैरअर्जदार क्रमांक २ यांना वीज पुरवठयापासून वंचित करणे योग्य नाही हे जरी बरोबर असले तरी ज्या ग्राहकाला (भाडेकरुला) वीजेचे देयक न भरल्यामुळे गेल्या १७ वर्षात कायम स्वरुपी बंद (P. D.) असलेल्या ग्राहकाला वीजेची गरज नसल्याचे दिसून येते. मग खालील प्रश्न उपस्थित होतात.

**प्रश्न** : १७ वर्षे कायम स्वरुपी बंद मुळे मीटर काढुन नेलेले असतांना म्हणजेच हा भाडेकरु विना विजेचा राहील्याचे दिसून येते. मग वीजेपासून वंचित असल्याचे कसे म्हणता येईल?

**प्रश्न** : न्यायप्रविष्ट प्रकरणात जागेसंबंधी वाद चालू असतांना नविन कनेक्शन / नविन मीटर देणे हे कायदेशीर नसून निर्बंध असतांना सुध्दा देण्यात आल्यामुळे हे शिस्तभंग व न्यायालयीन अवमान केल्याचे दिसून येते.

११) महाराष्ट्र वीज नियामक आयोग व भारतीय विद्युत कायदा २००३ अनुसार एखाद्या जागेसंबंधी किंवा कायदेशीर कब्जा संदर्भात न्यायप्रविष्ट असलेल्या ठिकाणी / जागेवर कोणतीही वीज जोडणी देण्यात येऊ नये.

वरील अवलोकनानंतर मी ग्राहक मंचाचा सदस्य खालील प्रमाणे माझा वेगळा निर्णय / आदेश पारीत करीत आहे.

## वेगळे मत (Differ Judgement)

१) अर्जदाराचा अर्ज अंशतः मान्य करण्यात येत असून भाडेकरु व जागा मालकाचा भाडे येणे संबंधी व सदर जागेच्या कब्जा संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे नविन दिलेली अभय योजने खाली कायदेशीर नसलेली वीज जोडणी तात्काळ बंद करुन उच्च न्यायालयाचा आदेश येई पर्यंत कोणताही हस्तक्षेप करु नये.

२) **COMMERCIAL CIRCULAR No. 211 PR-3/Special Amnesty Scheme/ dtd 01 OCT 2013** प्रमाणे विशेष अभय योजना या आधी महावितरण कंपनीने राबविण्यात आली होती. परंतु त्यामध्ये भाडेकरुने कोणत्याही प्रकारचा अर्ज केलेला नसल्याने व त्यातील कलम १० प्रमाणे १२ वर्षांच्या आतील ग्राहकांसाठी खुली होती. पण या केस मध्ये भाडेकरुने कोणतीही गरज दाखविली नसतांना व कालबाहय कालावधीसाठी पूरवठा देणे योग्य नसून तक्रारदाराच्या मागणीनुसार भाडेकरु ग्राहकाचे नियमबाहय दिलेली वीज जोडणी मा. उच्च न्यायालयाचा आदेश येई पर्यंत खंडीत करावी, असे आदेश मी महावितरणला देत आहे.

३) या व्यतिरिक्त कोणताही आदेश नाही.

स्वाक्षरीत
विलासचंद्र.सु.काबरा
सदस्य